# जेव्हा राष्ट्रपतींचा जावई परिसंवादाला येतो

— जयंत नारळीकर

(सत्य घटनेवर आधारित)

१ डिसेंबरची रात्र. दोन अडीचची वेळ. ''टिकेकर कहाँ है ?'' ''टिकेकरसाहब नीचे आवो''.

खालून येणाऱ्या आवाहनांनी टिकेकर खडबडून जागे झाले. गॅलरीतून पाहिले तर खाली दोन जीपगाड्या आणि शस्त्रधारी इसम. वरून अंधारात नीट कळत नव्हते की हे पोलिसचे लोक का गुन्हेगारी टोळीतले... का दहशतवादी ? काही झाले तरी वल्लभ विद्यानगरसारख्या लहानशा गावी सरदार पटेल विद्यापीठाच्या शांत आवारात यापैकी कोणीही येणे आणि तेही अशा अवेळी ही एक अभूतपूर्व घटना होती.

त्यातून टिकेकर म्हणजे आपल्या शिक्षण संशोधनाच्या सरळ मार्गाने जाणारा एक अध्यापक... मध्यमवर्गाच्या सुखदुःखात इतर चारचौघांप्रमाणे रमणारा. तरी पटेल - शहा - वसावडांच्या घरकुलांतून शोध घेत हे आगंतुक इथे येऊन ठेपले होते... त्यांच्यासाठी !

सौ. टिकेकरांना अर्थातच काळजी की नवऱ्याला खाली बोलावणारे हे उपटसुंभ कोण. पण 'कर नाही तर डर कशाला', अशा भावनेने टिकेकर खाली उतरले.

खाली गेल्यावर स्पष्ट झाले की, हे लोक पोलिसचे आणि सी. आय. डी.चे म्हणजे कायद्याच्या लक्ष्मणरेषेच्या अलीकडले. त्यातील इन्स्पेक्टरने विचारले, ''डॉ. टिकेकर तुम्हीच का ?''

''होय.''

''तुम्ही इथे कसल्या परिसंवादाचे आयोजन केले आहे ?'' इन्स्पेक्टरच्या विचारण्याच्या पद्धतीत आणि 'ही भररस्त्यात पार्क केलेली गाडी तुमचीच का ?' असे रहदारीच्या हवालदाराने विचारण्यात टिकेकरांना साम्य वाटले. ते उत्तरले :

''उद्यापासून... खरं म्हणजे आजपासूनच म्हटले पाहिजे... इथे इंडियन असोसिएशन फॉर जनरल रिलेटिव्हिटी अँड ग्रॅव्हिटेशनतर्फे एक परिसंवाद होणार आहे.''

गाड्यांचा ताफा आणि युनिफॉर्म तसेच मफ्तीतले पोलिस हजर झाले. इमारतीत परवानगीशिवाय प्रवेश देऊ नका - जे आत येतील त्यांनी मेटल डिटेक्टरच्या कमानीतून यावे - विद्यार्थ्यांचे क्लासिस बंद करा - इमारतीत हँडबॅग्ज आणू नका - इत्यादी इत्यादी फर्माने सुटली.

''अजून आर. आर. आलेला नाही, तरी इतकी दक्षता तर तो आल्यावर काय होईल ?'' एका हवालदील प्रतिनिधीनी विचारले.

दुसऱ्या प्रतिनिधींना काळजी की, त्यांची राहण्याची व्यवस्था ज्या विश्रामगृहात केली होती, तिथेच आर. आर. पण उतरणार होते. त्याचा आपल्याला कितपत त्रास होईल ?

अखेर मेटल डिटेक्टरची कमान उभारली गेली. पण त्या आधीच इमारतीत पुष्कळ लोक होते ! आणि येणारे जाणारे हा कसला अडथळा म्हणून त्या कमानीबाजूने जात. शिवाय इमारतीत आत जायला आणखी 'असुरक्षित' मार्ग होतेच... पण कमान उभारण्याचे कर्तव्य सुरक्षा दलाने पार पाडले होते.

मी इतर काही प्रतिनिधींबरोबर गणित विभागप्रमुख प्रा. वसावडांच्या ऑफिसमध्ये गप्पा मारत बसलो होतो. पुढचे चर्चासत्र सुरू व्हायला अवकाश होता. इतक्यात आर. आर. -चुकलो ! राष्ट्रपतींच्या जावयांनी - खोलीत प्रवेश केला. तेपण एवढ्या मोठ्या मनुष्यबळाचा स्वतःच्या सुरक्षेसाठी केलेला वापर पाहून सर्द झाले होते.

''माझ्यावर हल्ला किंवा माझे अपहरण व्हायची शक्यता काय असेल ती असो, पण असे पोलिसांचे कोंडाळे असले की हल्लेखोराला आपले लक्ष्य आपोआप उठून दिसते ! म्हणून मी जिथे जातो तिथे फक्त मफ्तीतले एक दोघे सोडून बाकी सर्वांना रामराम ठोकतो.'' आर. आर.नी अहमदाबादहून येताना मागे पुढे आणि बरोबर आलेल्यांना असाच रामराम ठोकला होता.

पण वल्लभ विद्यानगरच्या सुरक्षा



या उत्तराने इन्स्पेक्टर जेरीला आल्यासारखा दिसला. ''बरं ! बरं ! ते ठीक आहे. पण या परिसंवादाला प्रेसिडेंटचे जावई येणार आहेत हे खरे का ?''

''प्रेसिडेंटचे जावई ? ते काय मी ऐकलं नव्हतं !'' टिकेकर आश्चर्याने उद्गारले. ''पण खुद्द प्रेसिडेंट येणार आहेत.''

''प्रेसिडेंट ? तुमच्या परिसंवादाला ?''

''होय ! असोसिएशनचे प्रेसिडेंट नेहमीच परिसंवादाला हजर असतात. प्रेसिडेंट मुकुंदा यायचेत गुजरात मेलने.''

''ते नाही हो !'' जर इन्स्पेक्टरच्या ठायी विनोदबुद्धी असती तर त्याच्या चेहऱ्यावर स्मिताची लकेर उमटल्याबिगर राहती ना. पण त्याचा चेहरा परीटघडीच्या कापडाप्रमाणे होता. ''मला म्हणायचेय भारताचे प्रेसिडेंट... राष्ट्रपती वेंकटरामन. आता आमच्याकडे संदेश आलाय की, त्यांचे जावई मद्रासहून येत आहेत तुमच्या परिसंवादात भाषण करायला... त्यांना सर्वप्रकारचे संरक्षण पुरवा.''

टिकेकरांच्या डोक्यात प्रकाश पडला. व्ही. व्ही. आय. पीं.च्या जवळच्या नातलगांना सध्याच्या स्थितीत संरक्षण पुरवणे आवश्यक आहे. त्यातलाच हा प्रकार. पण प्रेसिडेंटचा जावई म्हणजे नक्की कोण ? ते आता इन्स्पेक्टरकडून कळेल... कारण परिसंवादात भाग घेणाऱ्यांपैकी कोणीही आपल्या बायोडेटात हे 'क्वालिफिकेशन' नमूद केले नव्हते.

''तर डॉ. टिकेकर, तुम्ही सांगा, प्रेसिडेंटचे जावई कोण ?'' इन्स्पेक्टर आपल्याला कोडे घालतोय असे टिकेकरांना वाटले. पण मग त्यांच्या लक्षात आले की, हे कोडे नसून प्रश्न होता. खुद्द इन्स्पेक्टरलाच माहीत नव्हते की जिचे रक्षण करायचेय ती व्यक्ती नेमकी कोण ?

सुदैवाने गणिती प्रश्न सोडवू शकणाऱ्या टिकेकरांना हाही प्रश्न सोडवता आला. मद्रासहून येणारा आणि परिसंवादात भाषण देणारा एकच शास्त्रज्ञ होता... डॉ. आर. रामचंद्रन. त्यांच्या मित्रांना आर. आर. म्हणून परिचित. प्रख्यात शास्त्रज्ञ पण राहण्या - बोलण्यात साधासुधा. काही लोक पहिल्या भेटीत पहिल्या चार-पाच वाक्यांत आपण एखाद्या स्थानिक बड्या-धेंडाचे 'जवळ'चे नातलग कसे आहेत ते सुनावतात. पण आपले नाते भारताच्या पहिल्या नागरिकाशी आहे, हे आर. आर.ने आपण होऊन कधी कोणाला सांगितले नसावे.

ओळख पटल्यावर इन्स्पेक्टरसाहेबांनी सांगितले की, सकाळी ते आणि त्यांची माणसे, परिसंवादाच्या ठिकाणी येऊन 'योग्य ती' सुरक्षा व्यवस्था करतील. त्यांचा ताफा तेथून निघाला. टिकेकर उरलेली झोप भरून काढायला जिना चढू लागले.

* * *

योग्य ती व्यवस्था म्हणजे काय याचे प्रत्यंतर परिसंवादात भाग घेणाऱ्यांना लवकरच आले. परिसंवाद गणित विभागातर्फे होता. तो विभाग ज्या इमारतीत, तिच्यासमोर ताफ्याला हे माहीत नव्हते. कारण चौघे युनिफॉर्मधारी एका दाक्षिणात्य प्रतिनिधीभोवती कोंडाळे करून उभे राहिले. तो फोन करत होता. तेवढ्यावरून त्यांनी असे गृहित धरले की, आपल्याला ज्याचे रक्षण करायचेय तो व्ही. आय. पी. हाच.

''तुम्ही इथे का उभे आहात'' प्रा. विश्वेश्वरांनी विचारले.

''तुमचे रक्षण करायला, सर ! आम्हाला तशी ऑर्डर आहे.''

''तो मी नव्हेच ! तुम्हाला पाहिजे तो व्ही. आय. पी. तिथे बसलाय''. आर. आर. लांबून मजा पहात होते. त्यांच्याकडे बोट दाखवून विश्वेश्वर म्हणाले.

* * *

संध्याकाळी आर. आर. म्हणाले... चला थोडे फिरून येऊ. आम्ही काही मित्रमंडळी विद्यापीठाच्या परिसरात चक्कर मारायला बाहेर पडलो. आर. आर.च्या सूचनेप्रमाणे दोन इसम फक्त या घोळक्यात होते. पण त्यांच्याकडे बंदुका होत्या. शिवाय काही अंतर सोडून एक पोलिस भरलेली जीप मागून येत होती, तर पुढे काही मफ्तीतले लोक चालत होते.

या वरातीतून जाण्यापेक्षा वेगळी चक्कर मारावी म्हणून मी प्रा. वसावडांच्या घराकडे मोर्चा वळवला.

''एकंदर हा परिसंवाद तुम्हाला बऱ्याच कटकटींचा ठरणार !'' मी म्हटले.

''जे काय राष्ट्रीय धोरण असेल त्याच्याशी सहकार्य करणे आवश्यक आहे.'' वसावडा आपल्या नेहमीच्या स्थितप्रज्ञ स्वरात म्हणाले. ''उगाच काही अनुचित प्रकार घडला तर आयोजकांवर ठपका यायचा ! पण...''

''पण, काय ?''

''आमचा खर्च मात्र वाढला. आत्ताच जे कॉन्फरन्स - डिनर झाले त्यांत हे सुरक्षा प्रतिनिधी पण होते. एकदम संख्या वीसाने वाढली. शिवाय पाच ऑफिसर्स मला विचारत होते की, आमची रात्री झोपायची सोय कुठे ?''

''पण सुरक्षा दलानी झोपायचे तर व्ही. आय. पी. वर पहारा ठेवायचा कोणी ?'' मी विचारले.

''हा प्रश्न मी पण विचारला. ते म्हणाले की त्यांचे काम पहारा करायचे नाही— ते काम पोलिसचे लोक करतात. ह्यांचे काम व्ही. आय. पी.च्या हालचालींवर लक्ष ठेवणे व त्यांच्या नोंदी ठेवणे. तसेच पुढील दिवसाचा कार्यक्रम आखणे.''

''पण ह्या लोकांच्या राहण्या - खाण्याची सोय सरकारतर्फे होत नाही ?''

''असेलही ! कोणी सांगावे ? पण आज रात्रीपुरती त्यांच्या झोपण्याची सोय मला करावी लागणार. आयोजक म्हणून नाही, तर मानवतेच्या दृष्टिकोनातून'' वसावडा म्हणाले.

''पण ह्या परिसंवादामुळे तुमचे गेस्ट हाऊस तर भरून गेलेय'' मी म्हटले.

''होय ! म्हणून हे पाच जण आज माझ्या घरी झोपतील. आज रात्रीपुरता मी व्ही. आय. पी.''